IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# संत बसवेश्वरांच्या आर्थिक तत्वांचा अभ्यास

**श्री. महेंद्र विठ्ठल बागुल**

सहाय्यक प्राध्यापक, शहाजीराजे महाविद्यालय खटाव. ता. खटाव जि. सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*महात्मा*

**ABSTRACT**

महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि अर्थचिंतक संत बसवेश्वर (इ.स.११३१-११६७ कर्नाटक) यांनी १२ व्या शतकामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रामध्ये क्रांतिकारी विचार मांडले. त्यांनी आर्थिक विचारांमध्ये समानता, संपत्तीचे वितरण, श्रमाचा सन्मान, व सामाजिक न्यायावरती भर दिला आहे. त्यांच्या आर्थिक तत्वांमागे मुख्य आधार 'कायक' (श्रमाचा सन्मान) आणि 'दासोह' (सामाजिक वितरण) होता. यामध्ये श्रमाला उच्च स्थान, समानता, न्याय वितरण, नैतिक अर्थव्यवस्था, आणि स्वावलंबन यांचा समावेश केला आहे. या संकल्पनांवर आधारित श्रम आणि सामाजिक न्यायाचा आदर्श ठेवून संत बसवेश्वरांचे आर्थिक तत्व आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेमध्येही अत्यंत मोलाचे व उपयुक्त ठरतात. या शोधनिबंधात आपण संत बसवेश्वरांच्या आर्थिक तत्वांचा विस्तृत अभ्यास करणार आहोत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Bagul, Mahendra Vitthal. (2025). संत बसवेश्वरांच्या आर्थिक तत्वांचा अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 419–422.

**१. प्रस्तावना**

आजच्या आधुनिक युगात आर्थिक विचारांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्राचीन काळापासून अनेक संत, तत्वज्ञ आणि समाजसुधारकांनी आर्थिक विचारांमध्ये योगदान दिले आहे. परिणामी भारताच्या मध्ययुगीन काळाचा अभ्यास करता. समाजामध्ये आर्थिक, सामाजिक, आणि धार्मिक विषमतेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येत होता. 'कायक' (श्रम) करणाऱ्या लोकांना कनिष्ठ समजले जात होते. व काही सधन लोकांच्याच हातात संपत्ती केंद्रित होती. म्हणून श्रम करणाऱ्या सर्वसामान्य लोकांना आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठा दिली जात नव्हती. त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल ठेवले जात. अशा परिस्थितीत १२ व्या शतकामध्ये भारतातील संत परंपरेतील संत बसवेश्वरांचे महत्वाचे स्थान आहे. त्यांनी समताधिष्ठित आणि श्रमाधिष्ठित अर्थव्येवस्थेचा विचार मांडला. समाजातील विषमता, जातीभेद, आणि आर्थिक शोषण याविरुद्ध आवाज उठवून अर्थव्येवस्थेत श्रमाला महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या श्रमावर जगावे असा संदेश दिला. सामाजिक न्याय आणि नैतिक मूल्यांची जाणीव करून आर्थिक विषमता दूर केली.

संत बसवेश्वरांनी केवळ श्रमाचाच नाही तर समाजात आर्थिक समता निर्माण करण्यासाठी 'दासोह' याही तत्वाचा प्रचार केला. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त असलेली संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी वापरावी. हा संदेश या तत्वानुसार सांगितला. स्वावलंबन, प्रमाणीकरण, समाजकल्याण, व नैतिकता या मूल्यांवर आधारित अर्थव्येवस्था मांडली. त्यामुळे समाजात समता, बंधुता व न्याय या मूल्यांची स्थापना होण्यास मदत झाली. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये संत बसवेश्वरांच्या आर्थिक तत्वांचा अभ्यास करून त्यांच्या कायक, दासोह, स्वावलंबन, आर्थिक समता व नैतिक अर्थव्येवस्था या तत्वांचे विवेचन करण्यात आले आहे.

**२. संत बसवेश्वरांचे आर्थिक तत्वे:**

**२.१. कायक सिद्धांताचा संदेश:**

'कायक' म्हणजे स्वत:च्या श्रमाने प्रामाणिकपणे कामकरून जीवन जगणे. श्रम करणे हेच सर्वात मोठे धर्म आणि कर्तव्य आहे.

**२.१.१ श्रमाची प्रतिष्ठा:**

व्यक्तीच्या जीवनात कोणताही व्यवसाय दुसऱ्या एखाद्या व्यवसायापेक्षा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असत नाही. अशी प्रतिष्ठा देण्याची सामाजिक सवय बदलून व्यक्तीच्या उपजीविकेच्या साधनाचे मूल्य प्रामाणिकपणा आणि कळकळ यावरून निर्धारित होत असते. असे संत बसवेश्वरांनी आर्थिक तत्वांच्या माध्यमातून ठणकावून सांगितले. हाच कायकाचा बीजमंत्र होय.

'कायक कैलास' याचा अर्थ (शिवरायांचे निवासस्थान) असे म्हणतात. श्रम करणे (स्वर्ग) प्राप्त करणे म्हणजे श्रमालाच पूज्य, साधना, आध्यात्मिक प्रतिष्ठा देऊन आर्थिक महत्व स्पष्ट केले. जसे वकिलाचे काम आणि न्हाव्याचे काम यांचे मूल्ये यांची प्रतिष्ठा समान असते. उदा. शेतकरी, सुतार, लोहार, शिक्षक, व्यापारी सर्वसमान आहेत. श्रमामुळे उत्पादनवाढून अर्थव्यवस्था मजबूत होते. [१]

**२.१.२ स्वावलंबन:**

'कायकाचा' आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे शारीरिक श्रमाला दिलेले महत्व. शरीर कष्टातूनच शरीराच्या गरजांची पूर्ती व्हायला हवी. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या श्रमावर जगावे. दुसऱ्यावर अवलंबून राहू नये श्रम केल्याने व्यक्ती स्वाभिमानी बनते.

**२.१.३ प्रामाणिकपणा आणि नैतिकता:**

'कायक' म्हणजे प्रामाणिक शरीरश्रम परंतु केवळ चरितार्थासाठी केल्या जाणाऱ्या शारीरिक काष्ठापेक्षा अधिक काहीतरी या कसल्पनेत अंतर्भूत आहे. श्रम प्रामाणिक, नैतिक आणि निष्ठेने करावे. श्रमावर आळशीपणाने बांडगुळासारखे जगण्याचा अधिकार नाही. फसवणूक, भ्रष्टाचार करणे टाळावे. श्रमातून मिळविलेले उत्पन्न शुद्ध असते. उपजीविकेसाठी करावयाचे श्रम हा त्याचा साधा प्राथमिक अर्थ होय. [४]

**२.१.४ सर्वांसाठी समान संधी:**

व्यवसाय निवडण्याच्या स्वातंत्र्याचे लोकशाहीवादी तत्व हा संत बसावेस्वरांने सांगितलेला आणखी एक महत्वाचा पैलू होय. कोणत्याही व्यक्तीच व्यवसाय त्यांच्या जन्माने अधिनिश्चीत होत असतो असे अधिकाराने सांगणाऱ्या जुलुमी कर्मसिधांता विरुद्ध त्यांनी बंड केले. व्यक्तीचा जन्म व्यवसाय, जात, धर्म, लिंग यावर आधारित नसतो. अशा प्रकारच्या भेदभावांचा संत बसवेश्वरांनी धिकार केला. प्रत्येकाला काम करण्याचा अधिकार आहे. सावरणं व समान आर्थिक संधी मिळणे आवश्यक आहे. संपत्तीची आणि श्रमाची समान विभागणी हे कायाकाचे मुख्य तत्व होय प्रत्येकजन आपापल्या कुवतीनुसार कष्ट करतो. आणि आपल्या व्यवसायाद्वारे प्रगतीतुन झालेल्या मिळकतीद्वारे समाजाची सेवा करतो. तिथे कुठल्याही प्रकारचा हवारेपणा, लोभ नसतो. अस्पृश्य मानले गेलेल्यासह सर्वांनाच सर्व क्षेत्रात संधी असतात. [१]

**२.२. दासोह सिद्धांत:**

संत बसवेश्वरांनी या सिद्धांताची मुळ संकल्पान समजून सांगितली. 'दासोह' हा शब्द दोन भागांचा तयार झाला आहे. 'दास' – म्हणजे सेवा देणारा किंवा समाजासाठी देणारा; तसेच 'ओह' – म्हणजे दान, उपकार किंवा वाटप असा होतो. [६]

**२.२.१ दासोह्चा आर्थिक दृष्टीकोन:**

संपत्तीचे पुनर्वाटप - माणसाने जीवनात मिळविलेले उत्पन्न समाजातील गरजू लोकांना दिल्यास त्यांच्यामधील आर्थिक विषमता कमी होते.

गरिबी निवारण – समाजातील गरिबांना दासोहामुळे आर्थिक मदत मोठ्या प्रमाणत मिळते ज्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. आणि भविष्यात गरीब वर्ग आत्मनिर्भर बनू लागतो.

आर्थिक स्थिरता – समाजात संपत्तीचे वाटप सम प्रमाणात असल्यास खरेदीची क्षमता वाढते. व बाजारपेठ स्थिर राहून आर्थिक संरचना मजबूत होण्यास मदत होते. [५]

**२.२.२. दासोह्चा सामाजिक दृष्टीकोन:**

समाजातील लोकांचा विश्वास आणि अतर्गत मदतीची भावना दासोहामुळे निर्माण होते. समाजाचे हित जपण्यासाठी व्यक्ती स्वतःची संपत्ती सामंजस्यपणे समाजातील लोकांना देताना नैतिक बंधने बांधले जातात.

**२.२.३ सामाजिक जबाबदारी:**

व्यक्तीने स्वतःच्या उत्पन्नातून आपल्या गरजा पूर्ण केल्यानंतर समाजासाठी उर्वरित उत्पन्न देणे, ही नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. व्यक्तीने असे केल्याने सामाजिक न्यायचे मूल्ये दृढ होते. तसेच समाजात संपत्तीचे समान वाटप केल्याने गरीब व श्रीमंत यांच्यामधील दुरावा कमी होतो.

समाजहितासाठी दान आणि सेवा उदा. शिक्षण, आरोग्य, गरिबांना आर्थिक मदत करणे या सर्व बाबी दासोहाच्या तत्वांशी जुळतात. दासोह फक्त तात्पुरती मदत नाही तर दीर्घकालीन समाजील विकासासाठी मार्गदर्शक आहे.

**२.२.४ नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टीकोन:**

संपती हि केवळ वैक्तिक उपजीविका भागाविण्यासाठीच नव्हे तर समाजहितासाठी असावी. अशी शिकवण व्यक्तीला दासोह सिद्धांत देतो. यामुळे व्यक्तीची नैतिक उंची आणि आत्मसन्मान वाढतो.

**२.३ आर्थिक समता आणि सामाजिक न्याय:**

संत बसवेश्वरांनी आर्थिक तत्वचा विचार मांडताना आर्थिक समता म्हणजे- समाजातील सर्व व्यक्तीनासमानता उत्पन्न, संसाधने व आर्थिक मदत यामध्ये समान संधी असणे. केवळ काही विशिष्ट व्यक्ती किंवा कुटुंबांना त्याचा फायदा मिळू नये, आर्थिक समता निर्माण झाल्यास संपत्तीचे वितरण करतांना समाजातील गरीब व श्रीमंत यांच्यातील अंतर कमी होते. यामुळे आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन अतिरिक्त संपत्ती गरजू व्यक्तीना दान करता येते. हे दासोह तत्वानुसार प्रत्यक्ष परिणाम दिसते.

सामाजिक न्याय म्हणजे- समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या अधिकार, गरजा आणि संधी पूर्ण करण्याचा न्याय मिळणे. संत बसवेश्वरांच्या दृष्टीकोनातून समाजामध्ये जात, आर्थिक पातळी, व सामाजिक स्थितीवर भेदभाव होऊ नये. प्रत्येक व्यक्तीला उत्पन्न, श्रम, संपत्तीमध्ये सामन संधी व वागणूक मिळावी. यामुळे शिक्षण, व्यवसाय, संपत्ती, आर्थिक सहभाग, सामाजिक सहकार्य वाढून संधीची न्याय वाटणी सुनिश्चित होते. [५]

**२.४ आत्मनिर्भरतेचा सिद्धांत:**

व्यक्तीने स्वतःच्या क्षमतेवर, कौशल्यावर आणि श्रमावर अवलंबून राहणे म्हणजे आत्मनिर्भर होय. संत बसवेश्वरांच्या मते व्यक्तीने इतरांवर अवलंबून न राहता स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी स्वतःच आपली उपजीविका निर्माण करणे आवश्यक आहे. कारण आत्मनिर्भर ही संकल्पान आर्थिक, सामाजिक आणि नैतिक दृष्टीने महत्वाचे तत्व आहे.

व्यक्ती आपल्या स्वतःच्या श्रमावर अवलंबून राहिल्यामुळे त्याची आर्थिक स्थिरता वाढते. यामुळे उत्पन्नावर नियंत्रण, खर्च, गुंतवणूक योग्य प्रकारे करता येते. आत्मनिर्भरतेमुळे व्यक्ती दुसऱ्याच्या संपत्तीवर अवलंबून राहत नाही. त्यामुळे समाजातील शोषण आणि अन्याय कमी होऊन आदर आणि स्वाभिमान वाढून आर्थिक विषमता दूर करणे शक्य होते. [२]

**३. संत बसवेश्वरांच्या आर्थिक तत्वांचे आधुनिक काळातील महत्व:**

आजच्या आधुनिक काळातील अर्थव्यवस्थेत संत बसवेश्वरांनी मांडलेली आर्थिक तत्वे कायक, दासोह, समानता, आत्मनिर्भर ही तत्वे महत्वाची मानली जातात. या विचारांमध्ये सामाजिक न्याय, नैतिकता, आर्थिक समतोल यांचा समन्वय आढळून येतो.

'कायक' (श्रम) या तत्वाने आधुनिक युगात सरकार राबवीत असलेल्या योजना- स्वयंम रोजगार निर्मिती, स्टार्टअप, कौशल्य, उद्योजकता, इतर यांना प्रेरणा देण्यासाठी हा सिद्धांत अत्यंत उपयुक्त ठरतो. यामुळे श्रमाची प्रतिष्ठा वाढून देशातील बेरोजगारी आणि गरिबी कमी करण्यास प्रोत्साहन मिळते. भ्रष्टाचार आणि अनैतिक मार्गाने पैसा कमावण्याची प्रवृत्ती कमी होते.

'दासोह' (वाटप) या तत्वाने आधुनिक युगात समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. अनेक उद्योगपती आज CSR ( Corporate Social Responsibility) अंतर्गत सेवा करतात. यामुळे समाजात गरीब, गरजू लोकांना मदत, सामाजिक न्याय, आणि सहकार्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण होत असते. उदा. उद्योगपती शाळा, रुग्णालये, दान संस्था चालवतात. [३]

आर्थिक समानता आणि सामाजिक न्याया या तत्वामुळे सरकारच्या आरक्षण धोरणामध्ये समानतेचा विचार दिसतो. आधुनिक लोकशाहीचे मुख्य तत्व म्हणजे समानता होय. महिलांना आणि दुर्बल घटकांना समान न्याय व संधी मिळते. यामुळे समाजात गरीब आणि श्रीमंत यातील अंतर कमी करण्यासाठी हा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

आत्मनिर्भर या तत्वामुळे आधुनिक काळात व्यक्ती स्वतःच्या कौशल्यावर आधारित आपली प्रगती करू शकतो. आत्मनिर्भर राष्ट्र ही संकल्पना याच तत्वावर आधारित आहे. यामुळे परकीय अवलंबित्व कमी करून देश मजबूत होतो.[२]

**४. निष्कर्ष:**

संत बसवेश्वरांनी १२ व्या शतकात मांडलेली आर्थिक तत्वे ही सामाज परिवर्तनाची व्यावहारिक आणि क्रांतिकारी दिशा दर्शवणारी आहेत. 'कायक' आणि 'दासोह' हे सिद्धांत मध्युगीन काळातील समाजातील आर्थिक व सामाजिक विषमते विरुद्ध विचार होते. 'कायक' तत्वाद्वारे श्रमाला उच्च प्रतिष्ठा देत त्यांनी स्वावलंबन, प्रामाणिकता, नैतिकता आणि समान संधी यांचा पुरस्कार केला. तसेच 'दासोह' द्वारे समाजात संपत्तीचे वाटप, सामाजिक दृष्टीकोन आणि जबाबदारी, नैतिक व अध्यात्मिक दृष्टीकोनातून आर्थिक तत्वांची संकल्पना मांडली. सामाजिक समता व न्याय आणि आत्मनिर्भर मानवी मूल्यांना केंद्रस्थानी स्थान आहे. आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेत वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, सामाजिक अन्याय व दुरावा, भ्रष्टाचार यांच्या यांच्या पार्श्वभूमीवर संत बसवेश्वरांचे आर्थिक तत्वे प्रेरणादायी आणि उपयुक्त मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भसूची:**

१. तिप्पेरुद्रस्वामी, एच. (२००६). *भारतीय साहित्याचे निर्माते – बसवेश्वर*. साहित्य आकादेमी, नवी दिल्ली.
ISBN: ८१-२६०-१६६६-३. वेबसाईट: https://www.sahitya.akademi.gov.in

२. कांबळे, डी. के. (२०१६). *बसवेश्वरांचे विचार आणि कार्य*. विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
ISBN: ९७८-९३८०४३५१२३. वेबसाईट: https://www.vidyaprakashan.in

३. कुलकर्णी, स. ग. (२०१०). *बसवेश्वर आणि त्यांचे तत्त्वज्ञान*. कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.
ISBN: ९७८-८१८८०८५६७५. वेबसाईट: https://www.continentalprakashan.com

४. घोणसे, डॉ. श्यामा. (२०२४). *क्रांतिदर्शी महात्मा बसवेश्वर*. भारतीय विचार साधना, पुणे.
ISBN: ९७८-८१९७०३७४०५. वेबसाईट: https://www.bhavisa.in

५. जाधव, बी.एन. (२०१२). *भारतीय समाजसुधारक*. डायमंड प्रकाशाचे, पुणे.
ISBN: ९७८८१२८८२९९८७. वेबसाईट: https://www.diamondpublication.com

६. पाटील, म. स. (२०१५). *संत बसवेश्वरांचे सामाजिक आणि आर्थिक विचार*. फडके प्रकाशन, कोल्हापूर.
ISBN: ९७८-८१९०८५५२४२. वेबसाईट: https://www.fadkeprakashan.com